**महाराष्ट्र शासन**
**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे**
**(महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत स्वायत्त संस्था)**
ई.मेल: sarthiforeignsch2023@gmail.com संकेतस्थळ:https://sarthi-maharashtragov.in
दूरध्वनी क्र. ०२०(२५५९२५०६) दिनांक: १५ मे, २०२५

जा.क्र.सारथी/परदेश शिष्य/२०२५-२६/ दिनांक: १५/०५/२०२५

# जाहिरात

**"महाराजा सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत सन २०२५-२६"**
**(एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत प्रवेश घेतलेले व घेणारे विद्यार्थी यांचेकरिता)**

महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असलेल्या "मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा" जातीतील गुणवंत मुला-मुलींना योजने अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांत पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी) अभ्यासक्रमाकरिता **QS (Quacquareli Symonds) World Ranking** २०० च्या आत रॅन्कींग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला/घेणार असेल, अशा विद्यार्थ्यांकरिता नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५- अ दि. २० जुलै २०२३ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्यविभाग, शासननिर्णय क्र. सनवि २०२४/प्र. क्र.७७/बांधकामे, दिनांक- २५ जुलै, २०२४ नुसार सदर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर योजनेअंतर्गत खालील अभ्यासक्रमांसाठी पात्र उमेदवाराकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ऑनलाइन (**Online**) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | पदव्युतर पदवी/ पदविका | डॉक्टरेट ( Ph.D) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी | २० | ०५ | २५ |
| २ | वास्तूकलाशास्त्र | ०४ | ०२ | ६ |
| ३ | व्यवस्थापन | ०२ | ०१ | ३ |
| ४ | विज्ञान | १० | ०५ | १५ |
| ५ | वाणिज्य/ अर्थशास्त्र | ०४ | ०५ | ९ |
| ६ | कला | ०४ | ०५ | ९ |
| ७ | विधी अभ्यासक्रम | ०४ | ०१ | ५ |
| ८ | औषध निर्माण शास्त्र | ०२ | ०१ | ३ |
| | एकूण | ५० | २५ | ७५ |

- **सर्वसाधारण अटी व शर्ती**

- लाभार्थी हा मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीतील महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये **एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत** प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यावत (सन २०२५) मधील) **QS (Quacquarelli Symonds) World Ranking २००** च्या आत असणे बंधनकारक आहे.
- त्यामुळे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधी व्यतिरिक्त कोणत्याही इतर उमेदवाराने/विद्यार्थ्याने अर्ज करू नये. अशा अपात्र विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.
- विद्यार्थ्याने अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे सर्वांसाठी पाहण्यास खुले राहतील. सदर माहिती/कागदपत्रे खोटी अथवा बनावट असल्याचे आढळून आल्यास त्याच्या विरुध्द प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांला परदेशातील QS world ranking मध्ये 200 च्या आत रँकींग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा. शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यावत (सन 2025 मधील) QS (Quacquarelli Symonds) World Ranking 200 च्या आत असणे बंधनकारक आहे.

- जाहिरातीत Ph.D च्या जाहिरात दिलेल्या परंतु त्यासाठी एकही पात्र अर्ज न आल्यास, त्या जागा त्या-त्या शाखेच्या रिक्त जागांमध्ये, शासन निर्णय क्रमांकः सारथी 2022/प्र.क्र.289/का.1425-अ, दि. 20 जुलै, 2023, परि.5- (**i**) नुसार, आंतरबदल निश्चित करण्यात येईल.
- वरीलप्रमाणे कार्यवाही करुन देखील उर्वरीत जागा करिता शासन निर्णय क्रमांकः सारथी 2022/प्र.क्र.289/का.1425-अ, दि. 20 जुलै, 2023, परि.5 - (**ii**) नुसार, विशिष्ट शाखासाठी नेमून दिलेल्या जागा, त्या शाखेत पुरेसे अर्ज न आल्याने, जास्त अर्ज आलेल्या शाखांमध्ये आं१३तरबदल करण्यात येतील. तसे केल्यानंतर एकत्रित प्रतिक्षा यादी तयार करुन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यविभाग, शासननिर्णय क्र. स.न.वि. 2024/प्र.क्र.77/ बांधकामे, दिनांक- २५ जुलै, २०२४, नुसार त्या विद्यार्थ्यांच्या QS World Ranking च्या मेरीट नुसार भरण्यात येईल. अशा प्रकारे एकुण सर्व 75 जागा अर्जाच्या उपलब्धते प्रमाणे भरण्यात येतील.
- परदेश शिक्षण शिष्यवृत्ती करिता Unconditional Offer Letter असावे असा शब्दशः उल्लेख काही ऑफ़र लेटर मध्ये दिसून येत नाही म्हणून फ़क्त conditional offer नसावी.
- **वयोमर्यादा** : पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची वयाची कमाल 35 वर्ष आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांच्या वयाची कमाल 40 वर्ष वयोमर्यादा असावी. (दिनांक १ मे २०२५ रोजीचे संभाव्य वय)

- विद्यार्थ्याने पदव्युत्तर/ पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना यापूर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. तसेच त्यांने अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज केलेला नसावा.
- परदेशातील विद्यापीठ/शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.
- एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.
- प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केली जाणार नाही.
- येत्या शैक्षणिक सत्रातील प्रवेशासाठी सन 2025-26 या शैक्षणिक/ आर्थिक वर्षाची शिष्यवृत्ती लागू राहील. त्यासाठी एप्रिल 2025 ते मार्च 2026 या कालावधी करिता म्हणजेच Spring 2025 (एप्रिल / मे 2025 ), Fall 2025 (जुलै/ ऑगस्ट/ संप्टेबर 2025 व Spring 2026 जानेवारी ते मार्च 2026) या कालावधीत प्रवेश झालेल्या किंवा होणारे विद्यार्थी या जाहिरातीस अनुसरून शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतील.

➢ **उत्पन्न मर्यादा :**

१. या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न रु. 8.00 लाखापेक्षा जास्त नसावे.

२. विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म न. 16 व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तहसीलदार यांचे उत्पन्नांचे प्रमाणपत्रासोबतच आयकर विवरण पत्र (ITR) सादर करण्यात यावे. ज्यांच्यासाठी आयकर विवरण पत्र भरणे बंधनकारक / आवश्यक नाही, त्यांच्याकडून तसे Affidavit सादर करावे.

➢ **शैक्षणिक अर्हता:** परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान 55% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

परदेश शिक्षण शिष्यवृत्ती करिता Unconditional Offer Letter असावे असा शब्दश: उल्लेख काही ऑफ़र लेटर मध्ये दिसून येत नाही म्हणून फ़क्त conditional offer नसावी.

➢ **अभ्यासक्रमाचा कालावधी :-**

१. पीएचडी-4 वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा जो कमी असेल तो.

२. पदव्युत्तर पदवी-2 वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो.

३. पदव्युत्तर पदविका-1 वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो

➢ **अर्ज करण्यासाठी अनिवार्य अटी :-**

➢ नोकरीमध्ये असलेल्या उमेदवारांनी तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (Organization Employer) ना हरकत प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.

➢ पात्र विद्यार्थ्याने Non Judicial Stamp Paper वर Public Notary समोर विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक असेल.

➢ विद्यार्थ्याने दोन जामीनदार देणे बंधनकारक असेल. या प्रत्येक जामीनदाराने स्वतंत्र Surety Bond करुन देणे बंधनकारक असेल.

➢ अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याचे स्वास्थ चांगले असले पाहिजे. त्याकरिता त्याने नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

➢ विद्यार्थी शिक्षणासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा शिक्षण त्यापूर्वी पूर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधी पुरतेच राहण्याचे बंधपत्र (Bond) राज्य शासनास तसेच परदेशातील भारतीय दुतावासास लिहून द्यावे लागेल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता परदेशात राहण्यास विद्यार्थ्यास परवानगी मिळणार नाही.

➢ विद्यार्थ्यास सारथीने विहीत करून दिलेल्या नमुन्यात Record Release Consent Form हा बंधपत्राच्या स्वरुपात द्यावा लागेल.

➢ विद्यार्थ्यास परदेशामध्ये प्रवेश मिळण्यासाठी QS World Ranking मधील 200 च्या आतील अद्ययावत जागतिक क्रमवारीत असलेल्या विद्यापीठ/शिक्षणसंस्था मध्ये प्रवेशासाठी स्वतः प्रयत्न करावा लागेल व त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परीक्षा देणे बंधनकारक असेल.

➢ ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही.

➢ विवाहीत उमेदवाराच्या पत्नी/पती व मुले यांना परदेशामध्ये सोबत घेवून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्यासाठी पासपोर्ट मिळविणे, व्हिसा मिळविणे, आर्थिक तरतूद करणे, परदेशातील निवास व दैनंदिन खर्चाची व्यवस्था करणे ही उमेदवाराची वैयक्तिक जबाबदारी असेल.

➢ नोकरी करणाऱ्या उमेदवारांनी सर्व प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वतः प्रत्यक्षपणे निराकरीत करावयाच्या आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून मिळणार नाही.

➢ **अ)** अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये, परदेशामध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यास भारतामध्ये यावयाचे असल्यास त्यासाठी त्याचे संबंधित शैक्षणिक संस्था आणि संबंधीत शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल आणि याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थी भारतीय दूतावासास कळवतील.

**ब)** जेवढ्या कालावधीमध्ये परदेशातील शैक्षणिक संस्थेमधून दूर असेल, तेवढ्या कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणिक संस्थेत त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी हजर झालेल्या दिवसापासून त्यास देय लाभ अनुज्ञेय होतील.

**क)** अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने परत त्याच परदेशी शिक्षण संस्थेमध्ये हजर न होता शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यास अदा करण्यात आलेले शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इतर शुल्क व निर्वाहभत्याची व्याजासह वसूली करण्यात येईल, याबाबतचे लेखी हमीपत्र विद्यार्थ्यास द्यावे लागेल.

➢

➤ **एकाच कुटुंबातील कमाल पात्रता धारक :-**

**(अ)** परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेअंतर्गत पदव्युत्तर पदवीचा अभ्यास सुरु असतांना त्या विद्यार्थ्यास डॉक्टरेट पदवी (पीएच.डी) साठी शासन निर्णयात अंतर्भूत विषयांत दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेअंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विद्यार्थ्याने निवड समिती/शासनास रितसर अर्ज करून मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणात संबंधित शैक्षणिक संस्थेची जागतिक क्रमवारी (QS World Ranking) त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणात विद्यार्थ्यास मिळणारा एकूण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेतच दिला जाईल. उदा. विद्यार्थ्याने दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करतांना डॉक्टरेट (पीएच.डी) करण्यासाठी परदेशी शैक्षणिक संस्थेत दर्जावाढ प्राप्त केली तर त्या विद्यार्थ्याला शासनाने विहित प्रक्रियेद्वारे मान्यता दिल्यास त्यानंतरच्या पुढील दोन वर्षांसाठी शासन निर्णयातील नमूद सर्व लाभ घेता येतील. या कालावधी नंतर होणारा पुढील संपूर्ण खर्च मात्र विद्यार्थ्याला करावा लागेल.

**(आ)** एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करून देणे बंधनकारक असेल.

**(इ)** एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटूंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहील्यास एका कुटूंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.

➤ **आवश्यक कागदपत्रे :**

(i) विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज,

(ii) सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला व ITR AY २०२५-२६ / Form No. १६.

(iii) पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे. (दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर,पदवी/पदविका यांच्या गुणपत्रिकांसह) (सनद/मार्कलिस्ट),

(iv) परदेशातील QS World Ranking 200 च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे ऑफर लेटर.

(v) ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याचे सविस्तर माहिती पत्रकाची (Prospectus) प्रत.

(vi) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी अद्ययावत QS World Ranking ची जागतिक क्रमवारी.

- वेळोवेळी सारथी या संस्थेने ठरवून दिलेले बंधपत्र/विविध दाखले तसेच अन्य कागदपत्रे सादर करणे लाभार्थ्यांवर बंधनकारक राहील.

➤ पासपोर्ट व व्हिसा मिळविण्याची जबाबदारी उमेदवार/विद्यार्थ्याची असेल.

➤ उमेदवारास/विद्यार्थ्याना केवळ ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेला आहे व शिष्यवृत्ती मिळाली आहे त्याच कारणासाठी व्हिसा घेणे बंधनकारक असेल.

➤ निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व आवश्यक ते करारनामे देणे बंधनकारक असेल.

➤ निवड झालेल्या विद्यार्थ्यास त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये जास्तीची रक्कम अदा झाली असल्यास त्याची परतफेड करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल. अथवा ती वसूल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक असेल.

➤ सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

➤ **योजनेतील लाभाचे स्वरुप**

➤ विद्यार्थ्यांना मिळणारे शिष्यवृत्ती अंतर्गत विविध लाभ शासन निर्णय क्रमांक सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५- अ दि. २० जुलै २०२३ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्यविभाग, शासननिर्णय क्र. सनवि २०२४/प्र. क्र.७७/बांधकामे, दिनांक- २५ जुलै, २०२४ मध्ये दिल्यानुसार राहतील. यामध्ये महाराष्ट्र शासनाने काही बदल/ सुधारणा केल्यास त्यानुसार देय राहतील.

➤ विद्यार्थ्यास परदेशी शिक्षण संस्थेमार्फत किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती, इतर कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ किंवा शिकविण्याबाबतचे मानधन किंवा फेलोशिप किंवा रिसर्च असोशिएट म्हणून मिळणारी ही रक्कम देय होणाऱ्या शिक्षण शुल्क वा एकूण देय रक्कमे मधून कपात करण्यता येईल.

➤ विद्यार्थ्यांस परदेशात राहण्याच्या कालावधीसाठी विद्यापीठाने ठरवून दिल्यानुसार वैयक्तिक आरोग्य विमा (Personal Health Insurance) काढणे अनिवार्य राहील. यासाठीचा संबंधीत विद्यापीठाच्या निकषानुसार किमान खर्च सारथी संस्थेकडून अनुज्ञेय राहील.

➤ शिक्षण शुल्क, निर्वाहभत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा आणि यासाठी निर्धारीत केलेल्या दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च विद्यार्थी/उमेदवारास स्वतः सोसावा लागेल व अशा प्रकारचे हमीपत्र विद्यार्थ्यास व पालकास अर्जासोबत द्यावे लागेल.

➤ विद्यार्थ्यास वरील लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून, तसे शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificate), खर्चाच्या पावत्या इ. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडून प्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील हप्ता मंजूर होणार नाही.

➢ **इतर आवश्यक बाबी :**

- अपूर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड न झालेल्या विद्यार्थ्यांना अपात्रतेची कारणे कळविण्यात येणार नाही याची अर्जदार विद्यार्थ्यांनी/उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- अर्जासोबत आवश्यक असलेली स्वसाक्षांकित कागदपत्रे न जोडल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. अर्जावर स्वसाक्षांकित फोटो नसलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- **QS World University Ranking** 200 च्या आतील विद्यापीठाशिवाय इत्तर परदेशी शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- प्रचलित अटी व शर्तीनुसार अपात्र ठरल्यास त्यांना स्वतंत्र पत्रव्यवहार करुन कळविले जाणार नाही.
- निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या ई-मेल द्वारे कळविले जाईल. जर विहीत कालावधीत त्यांनी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण न केल्यास त्याची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.
- परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अंतिम अधिकार शासनास असतील.
- शासनाने सर्व विभागाच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषामध्ये समानता आणण्या करीता सर्वकष धोरण ठरविले आहे. त्यामुळे नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार तयार केलेल्या सर्वकंष नियमावलीचे सर्व विभागांनी पालन करणे अपेक्षित असल्याने नियोजन विभागाने घेतलेला शासन निर्णय अंतिम असेल त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (बांधकामे) कार्यासनामार्फत दि 30.10.2023 रोजी या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्या संदर्भात दि.9.11.2023 रोजी शासन शुध्दीपत्रक निर्गमित केलेले आहे त्यानुसार नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र. सारथी 2022/प्र.क्र.289/का.1425-अ दि.20.7.2023 व दि. 25.7.2024 रोजीच्या शासन निर्णयानुसार तयार केलेल्या सर्वकष नियमावलीचे सर्व विभागांनी प्रमाण मानावे. सदर योजनेअंतर्गत लाभ घेवू इच्छित असलेल्या विद्यार्थ्यास पुढील सत्राचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून त्यासाठी शैक्षणीक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.
- सदर योजनेच्या सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दिनांक दि. 30.10.2023 व दि.9.11.2023 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार तसेच नियोजन विभागाचा शासन निर्णय दि.20.7.2023 व सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दि. 25.7.2024 व शासन पत्र दि.28.2.2025 मधील अटी शर्ती लागू राहतील. तसेच जाहिरातीमध्ये सदर योजनेच्या अत व शर्ती स्पष्ट नमूद केलेले आहेत. त्यानुसार व्यवस्थित अर्ज सादर करण्याची अर्जदारांनी पूर्ण खबरदारी घ्यावी.

➢ **खोटी माहिती सादर करणे :**

कोणत्याही विद्यार्थ्यांनी/ उमेदवाराने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कर्तव्यात कसुर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarr) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची 15 % चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल. अशा विद्यार्थी / उमेदवाराचा काळया यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. आणि त्यांनी दिलेले जामीनदार आणि संदर्भ अधिकारी/ व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल. सदर प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेवर आधारित असून कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव अथवा दबावतंत्र वापरल्यास संबंधित विद्यार्थ्यांस/ उमेदवारास काळया यादीत समावेश केला जाईल याची नोंद घ्यावी.

**शासन निर्णय क्रमांक : सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२० जुलै, २०२३ चे**

**परिशिष्ट - अ**

**परदेश शिष्यवृत्तीकरीता मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम**

| | Engineering/ | Architecure | Management | Science | Arts & Commerce | Law | Pharmacy |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | *Permissible Courses :- P.G./P.G. Diploma/ Ph.D. | P.G./P.G.Diploma/Ph.D | *Permissible Courses :- P.G./ P.G. Diploma | *Permissible Courses :- P.G./ Ph.D | *Permissible Courses :- P.G./ Ph.D | *Permissible P.G./Ph.D | *Permissible P.G./Ph.D |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | Civil | Architecture | 1. M.B.A. with Finance/ Marketing/H.R./ System Analysis | 1. Agriculture | 1.Sociology | L.L.M. | M. Pharm |
| 2. | Mechanical | | 2.Hotel Management | 2. Horticulture | 2.Psychology | | |
| 3. | Electrical | | | 3.Animal Husbandry | 3.Philosophy | | |
| 4. | Chemical | | | 4.General Science | 4.Economics | | |
| 5. | Computer | | | 5.Maths | 5. Commerce | | |
| 6. | Production | | | 6.Physics | 6. Applied Art | | |
| 7. | Industrial Engg. | | | 7. Chemistry | 7. Fine Art | | |
| 8. | Environmental Engineering | | | 8.Botany | | | |
| 9. | Mining Engg. | | | 9.Zoology | | | |
| 10. | Petrochemical | | | 10.Statistics | | | |
| | Electronic & TC | | | 11.Physics | | | |
| | Information Technology/ Information System/ Information Science/ Computer Engineering | | | | | | |
| 11. | Bio-Technology | | | | | | |
| 12. | Genetic Engineering | | | | | | |
| 13. | Nano Technology | | | | | | |
| 14. | Industry Internet of Things (IIOT) | | | | | | |
| 15. | Cyber Law/Cyber Security | | | | | | |
| 16. | Biomedical Engg. | | | | | | |
| 17. | Climate Change | | | | | | |
| 18. | Artificial Intelligence | | | | | | |
| 19. | Reversible energy | | | | | | |
| 20. | Climate Change | | | | | | |
| 21. | Data Analaysis | | | | | | |
| 22. | Cloud Computing | | | | | | |
| | **Eligibility** | | | | | | |
| | **Graduation for P.G. & Post Graduation for Ph.D in relevant subjects** | | | | | | |

- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता मिळणारे लाभ व निवड पद्धत, सुधारित वेळापत्रक इत्यादी माहितीकरिता सारथी संस्थेचे संकेतस्थळास **https://sarthi-maharashtragov.in/** वेळोवेळी भेट द्यावी.
- नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक सारथी २०२२ /प्र.क्र. २८९/का १४२५-अ दि. २० जुलै, २०२३ व सामाजिक न्याय व विशेष सहाव्यविभाग, शासननिर्णय क्र. सनवि २०२४/प्र. क्र.७७/बांधकामे, दिनांक- २५ जुलै, २०२४ मधील परिशिष्ठ-अ व परिशिष्ठ- ब मध्ये नमूद बाबीनुसार प्राप्त अर्जाबाबत मंजुरीची कार्यवाही करण्यात येईल.
- इच्छुक उमेदवारांनी **fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर **नियोजन विभाग (Planning Department)** या विभागाच्या **link वर ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज** भरावा व ऑनलाइन (Online) भरलेल्या अर्जाची मूळ प्रत, प्रमाणपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रती पडताळणीसाठी, आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक- १६ जून, २०२५ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत समक्ष सारथी, सामाजिक न्याय विभाग, कक्ष-४०७, मुख्यालय इमारत, गोपाळ गणेश आगरकर रोड, पुणे, महाराष्ट्र – ४११००४ येथे सादर करावे. कमी अर्ज प्राप्त झाल्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार सारथी संस्थेस राहील.
- सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने सर्वंकष धोरणाने घेतलेला निर्णय अंतिम राहिल. जाहिरातीमधील नमुद अटी व शर्तीमध्ये व लाभामध्ये महाराष्ट्र शासनाकडून काही बदल झाल्यास त्या त्या वेळी लागू राहतील. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**टीप**:- ऑनलाइन (Online) स्वरूपातील अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने अर्ज सादर केल्यास तो अर्ज विचारात घेतला जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी वरील नमूद कालावधीतच अर्ज दाखल करण्याची दक्षता घ्यावी.

**राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक,सारथी, पुणे**